# प्रकरण पाचवे

---

## समारोप

# प्रकरण पाचवे

# समारोप

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टीने कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती, महात्मे व संत आजवर होऊन गेले आहेत. त्यात संत गाडगेबाबांचा क्रम वरचा आहे. समाजातील अज्ञान, घातक सवयी, अनिष्ठ सामाजिक व धार्मिक रूढी-परंपरा यांच्यावर आघात करण्याचे कार्य त्यांनी आपल्या कीर्तनाद्वारे केले. अखंड परिश्रमाद्वारे दीन-दुबळयांना, गोर-गरीबांना, अंध-पंगूंना मदत केली. आपल्या कृतीने त्यांनी समाजासमोर असामान्य त्यागाचे चित्र उभे केले. विचारांचा गोंधळ न करता सरळ पद्धतीने नितीविचार समजावून तो विचार आचरणात आणणारे गाडगेबाबा हे अलौकिक व्यक्तीमत्व होते. धर्म सांगायचा नसतो, तो जगायचा असतो असे सांगणारे व सतत ५० वर्षे जनसामान्यांचे आपल्या कृतीद्वारे, कीर्तनाद्वारे प्रबोधन करणारे गाडगेबाबा हे एक थोर मानवतावादी संत होते.

संत गाडगेबाबांनी इ.स.१९०५ मध्ये गृहत्याग केला. काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, लोभ या षडरिंपुवर विजय मिळवून ते जितेंद्रिय बनले. समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा, अन्याय, अत्याचार, दारिद्रय, अज्ञान पाहिले, अनुभवले यातून समाजाची मुक्ती करण्यासाठी सामाजिक कार्य करण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यासाठी भूकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघडया-नागडयांना वस्त्र, बेकारांना रोजगार, अंध-पंगू- रोग्यांना औषधोपचार, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना अभय, दु:खी निराशांना हिंमत, गोर-गरीब तरूणींचे लग्न इत्यादी स्वत:चे १० संदेश त्यांनी आपल्या कार्याचे सूत्र बनवले. त्याप्रमाणे त्यांनी कार्य करण्यास सुरूवात केली. इ.स.१९०६ मध्ये ऋणमोचन ( जि.अमरावती ) येथे भाविकांच्या सोयीसाठी त्यांनी नदीवर घाट बांधून यात्रेकरूंची गैरसोय दूर केली. त्यानंतर त्यांनी पंढरपूर, आळंदी, देहू, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पुणे, मुंबई, ब्रम्हपुरी (जि.सातारा) इत्यादी ठिकाणी एकूण १७ धर्म

शाळा स्थापन केल्या. या सर्व धर्मशाळांचे ट्रस्ट स्थापन केले. विश्वस्तांची नियुक्ती केली. धर्मशाळा प्रशासनासाठी नियमावली तयार केली. धर्मशाळा सर्व जाती-धर्माच्या लोकांसाठी खुल्या केल्या. अंध-पंगू-रोगी, यात्रेकरूंना मोफत राहण्याची व भोजनाची सोय केली. त्यासाठी धनिक व दानशूर मंडळींकडून लाखो रूपयांची देणगी मिळविली. गाडगेबाबांनी स्थापन केलेल्या या धर्मशाळा गरजू-गरीब, यात्रेकरू, अंध-पंगू लोकांसाठी 'दीपगृहे' ठरली.

संत गाडगेबाबा फक्त धर्मशाळा स्थापन करून थांबले नाहीत. त्यांच्या मनात मुक्या प्राण्यांबद्दल अपार करूणा होती. या करूणेपोटी त्यांनी मुक्या जनांवरासाठी मुर्तिजापूर (जि.अकोला), नागरवाडी (जि.अमरावती) या ठिकाणी गोरक्षण संस्था स्थापन केल्या.अंध-पंगूसाठी नाशिक, ऋणमोचन, मुर्तिजापूर, अमरावती इत्यादी ठिकाणी अंध-पंगू सदावर्ते सुरू केली. पिण्याच्या पाण्यासाठी धार्मिक ठिकाणी पाणपोई बांधल्या. तहानलेल्यांना तृप्त करणे हा जीवनधर्म असतो हे त्यांनी दाखवून दिले.वरील रचनात्मक कार्यासाठी गाडगेबांबानी जनता-जर्नादनाचे सहकार्य घेतले. पन्नास वर्ष कण कण झिजवून साऱ्या महाराष्ट्रात ते वणवण भटकले. देणग्या, मदतीतून त्यांनी कोटयावधी रूपये जमविले. त्याचा उपयोग महाराष्ट्रात अद्वितीय अशा सामाजिक कार्यासाठी झाला.

संत गाडगेबाबांनी स्वत: स्थापन केलेल्या संस्थांना संघटित रूप देऊन शैक्षणिक व सामाजिक कार्य करण्साठी इ.स.१९५२ मध्ये मुंबई येथे श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना केली. 'सेवा परमो धर्म:' मिशनचे ब्रीदवाक्य ठरविले. आदिवासी, अस्पृश्य ब बहुजन समाजात शिक्षण प्रसार करणे, वृद्धांसाठी वृद्धाश्रम सुरू करणे, अहिंसा तत्वाचा प्रसार करणे, अनाथ मुलांसाठी बालकाश्रम व पाळणाघरे सुरू करणे इत्यादी मिशनची उद्दिष्टे ठरविली. गाडगे महाराज मिशनद्वारे ही उद्दिष्टे साध्य करण्याचे गेली ५० वर्षे अखंडपणे कार्य सुरू आहे. इ.स. १९५४ मध्ये राहुरी (जि.अहमदनगर) या ठिकाणी गाडगे महाराज मिशनने महाराष्ट्रातील पहिली आश्रशाळा सुरू केली.

सन १९५२-२००२ या ५० वर्षांच्या कालखंडात गाडगे महाराज मिशनचा कार्यविस्तार मोठया प्रमाणात झाला. सन १९५२ ते १९६२ या कालखंडात मिशनने चार प्राथमिक आश्रमशाळा, एक विमोचीत जातीजमातींच्या मुलांची आश्रमशाळा, आठ विद्यार्थी वसतिगृहे, तीन कन्याप्रशाला, एक वृद्धाश्रम सुरू केलेले दिसून येते. सन १९६२ ते १९७२ या कालखंडात मिशनने पाच माध्यमिक वसतिगृहे, पाच माध्यमिक विद्यालये, दोन कन्याशाळा, एक बालकमंदिर, चार प्राथमिक आश्रमशाळा स्थापन केलेल्या दिसून येतात. तसेच सन १९७२ ते १९९२ या वीस वर्षाच्या कालखंडात गाडगे महाराज मिशन संचलित ३९ शाखा-उपशाखा सुरू झालेल्या आहेत. या कालखंडात मिशनचा विस्तार होण्याचे कारण म्हणजे मिशनला शासकीय अनुदान मिळाले. सन १९९२ ते २००२ या कालखंडात यशवंतराव मानेबाबा व विश्वनाथ वाघबाबा यांच्या नेतृत्वाखाली सुमारे २९ शाखा सुरू झाल्याचे दिसून येते. श्री गाडगेबाबांचे १० कलमी संदेश मिशन संचलित शाखांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आत्मा असल्याचे जाणवते. गाडगे महाराज मिशनचा कार्यविस्तार बहुविध क्षेत्रात झालेला दिसून येतो.

श्री गाडगे महाराज मिशन या शैक्षणिक व सेवाभावी संस्थेच्या प्रशासनामध्ये बदलत्या परिस्थितीप्रमाणे टप्या टप्याने बदल होत गेले आहेत. इ.स.१९५२ मध्ये मिशनची स्थापना केल्यानंतर मिशनचे संस्थापक श्री गाडगेबाबांनी मिशनच्या प्रशासकीय कारभारासाठी अल्पशी प्रशासकीय रचना तयार केली होती. मिशन प्रशासनामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, सेक्रेटरी आणि ११ अन्य सभासदांचा समावेश होता. त्यांच्यामार्फतच मिशनचे सुरूवातीच्या कालखंडातील प्रशासन चालविले जात होते. सन १९५२ पासून मिशनचा शाखाविस्तार वाढत होता. इ.स.१९७० पर्यंत मिशन संचलित शाखांची संख्या ३७ होती. मिशनच्या या विस्तारीत कार्याची जबाबदारी सुरूवातीच्या कालखंडातील प्रशासनास चालविणे कठीण होऊ लागले. त्यामुळे मिशनच्या प्रशासनाने सन १९७१ साली मिशनच्या मूळ घटनेत बदल करून त्यात सर्वसाधारण समिती, केंद्रीय कार्यकारी मंडळ, आजीव सेवक, हितचिंतक, प्रचारक इत्यादी घटकांचा मिशनच्या

प्रशासन व्यवस्थेत समावेश केला. तसेच शाखा-उपशाखांचे प्रशासन कसे चालवावे हे ठरवून दिले. प्रत्येक शाखांसाठी संचालकांची नेमणूक केली. त्यामुळे मिशनच्या केंद्रीय प्रशासनावर पडणारा कामाचा बोजा कमी झाला व कारभारात सुसूत्रता आली. त्यामुळे मिशनच्या कार्याला गती मिळाल्याचे दिसून येते. कै.दादासाहेब देशमुख, कै.जिजाबा मोहिते-पाटील, कै.विश्वनाथ वाघ, श्री यशवंतराव माने, कै.राजाराम घोंगटे, श्री.तुकाराम खांडवे, श्री.विष्णुभाऊ नाचवणे, तुकाराम शिंदे ... या मंडळींनी गाडगे महाराज मिशनच्या कार्यात मोलाचे योगदान दिले आहे.

गाडगे महाराज मिशन संचलित शाखांच्या इमारती मिशनच्या मालकीच्या आहेत. सर्व आश्रमशाळांशी संलग्न वसतिगृहे सुरू केलेली आहेत. आश्रमशाळा मधील सर्व मुला-मुलींना मोफत शिक्षणाची व राहण्याची आणि भोजनाची सुविधा मिळते. यासाठी धर्मादाय देणग्या व शासकीय अनुदान मिळते.

गाडगे महाराज मिशनचा कार्याचा अभ्यास केल्यानंतर व मिशनची इतर संस्थाशी तुलना केल्यास काही त्रुटी दिसून येतात. त्या म्हणजे गाडगे महाराज मिशनने माध्यमिक शाळेत रयत शिक्षण संस्थेप्रमाणे 'कमवा व शिका' ही योजना राबवलेली दिसून येत नाही. उच्च शिक्षणासाठी मिशनने एकही महाविद्यालय सुरू केले नाही .व्यावसायिक शिक्षण, तंत्रशिक्षण इत्यादी बाबींकडे मिशनचे दुर्लक्ष झाले आहे. सन १९७१ च्या गाडगे महाराज मिशनच्या घटना दुरूस्तीमध्ये मिशनचा दरवर्षी वार्षिक अहवाल सादर केला जाईल असे नमूद झालेले असूनसुद्धा सन १९९१-१९९२, १९९३, २००२ या वर्षांचे वार्षिक अहवाल वगळता इतर वर्षाचे वार्षिक अहवाल सादर झालेले दिसून येत नाहीत. सुरवातीपासून गाडगे महाराज मिशनच्या मुख्यालयाची इमारत १४ बाय १० फुटांची आहे. इतक्या लहान इमारतीमध्ये एवढया मोठया सामाजिक व शैक्षणिक संस्थेचा कारभार चालविणे कठीण होत असताना सुद्धा त्या इमारतीचे विस्तारीकरण केलेला नाही किंवा रयत शिक्षण संस्थेप्रमाणे मिशनची विभागीय कार्यालये स्थापन केलेली नाहीत. वरील काही त्रुटी वगळल्यास सन १९५२ मध्ये स्थापन झालेल्या गाडगे महाराज मिशनचे कार्य

उल्लेखनीय आहे. सन २००२ मध्ये श्री गाडगे महाराज मिशनने आपल्या कार्याचा सुवर्णमहोत्सव साजरा केला. गेल्या पाच दशकात संत गाडगेबाबांच्या ध्येयधोरणाप्रमाणे मिशन सेवक, प्रचारक, हितचिंतक, प्रशासकीय पदाधिकारी यांनी मिशनला सदैव विकासोन्मुख केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात गाडगे महाराज मिशनने आपले शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सुरू ठेवले आहेत. समाजातील अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती, बहुजन समाजातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचे मिशनने नेहमी भान ठेवले आहे. संत गाडगेबाबांचे संदेश भूकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, गोरगरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना निवारा, निराधारांना आधार यानुसार मिशनने गेल्या ५० वर्षात सुमारे १५० पेक्षा अधिक शैक्षणिक व सामाजिक शाखा कार्यान्वित केलेल्या आहेत. यातून १५०० कर्मचारी सेवक, ४५००० विद्यार्थी /विद्यार्थीनींच्या जीवनाशी श्री गाडगे महाराज मिशन निगडीत झाली आहे. याशिवाय ५०० निराधार बालके, ३०० वृद्ध मंडळी मिशनच्या कार्याची अंगे बनली आहेत. गाडगेबाबांचे सामाजिक प्रबोधनाचे कार्य, नशाबंदी, जातीभेद उच्चाटन, अंधश्रद्धा निर्मूलन, हिंसाबंदी, सामुदायिक विवाह आदिबाबत मिशनचे संचालक, प्रचारक, सेवकांकडून कीर्तन, प्रवचन, कलापथकांच्या माध्यमातून कार्य सुरू आहे.

मिशनच्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून सन १९८६-८७ व सन १९८७-८८ मध्ये अनुक्रमे **'दलितमित्र'** व **'आदिवासी सेवक संस्था'** असे दोन गौरवपुरस्कार श्री गाडगे महाराज मिशनला मिळाले आहेत. यावरूनच गाडगे महाराज मिशनच्या कार्याचे वेगळेपण दिसून येते.

### श्री गाडगेबाबा व मिशन कार्याचा प्रभाव :

गाडगेबाबा कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी आयुष्यभर 'खराटा धर्म' सोडला नाही. त्यांनी गावा-गावातील रस्ते, तुंबलेली गटारे, गलिच्छ वस्त्या, सार्वजनिक ठिकाणे, यात्रा ठिकाणे, कीर्तनाच्या जागा इत्यादी ठिकाणी अखंड ५० वर्षे स्वच्छता

केली. कीर्तनाद्वारे आमजनतेला स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. गाडगेबाबांचे हे विचार, तत्वज्ञान व कार्य उशीरा का होईना शासनकर्त्यांना पटले.

ग्रामीण भागातील गावांची, घरांची सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता व्हावी, सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान पर्यायाने जीवनमान उंचवावे. त्यायोगे **'स्वच्छतेकडून समृद्धीकडे'** ही गाडगेबाबांची संकल्पना मूर्त स्वरूपात यावी या उद्देशाने महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री ना.आर.आर. पाटील यांनी सन २000-२00१ पासून महाराष्ट्रात **'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान'** सुरू केले आहे. महाराष्ट्रात दरवर्षी २ ऑक्टोंबर ते ३0 ऑक्टोंबर या काळात गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानार्तगत ग्रामसफाई मोहिम, संडास बांधकाम जागृती मोहिम, शाळा, सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम, वैयक्तिक स्वच्छता जागृती मोहिम, रस्ते दुरूस्ती, श्रमदान मोहिम व्यसनमुक्ती वृक्षसंवर्धन, साथीचे रोग प्रतिबंध माहिम वगैरे उपक्रम राबविले जातात. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानासाठी महाराष्ट्रशासनाकडून ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा पातळी, विभागीय स्तर, राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकवणाऱ्या गावास अनुक्रमे रूपये दहा हजार रूपये, पंचवीस हजार रूपये, पाचलाख रूपये, दहा लाख रूपये, पंचवीस लाख रूपये, अशा स्वरूपात बक्षिसे दिली जातात.[१] गेल्या ८ वर्षापासून महाराष्ट्रातील संपूर्ण खेडयापाडयातून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानासाठी लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो आहे. त्याचे मूळ कारण गाडगेबाबांनी केलेल्या मत परिवर्तनात आढळेल. गाडगेबाबांनी ५0 वर्षापूर्वी पेरलेल्या संस्कारांना या अभियानाच्या रूपाने देखणे स्वरूप आले आहे. शाश्वत संस्कार कधी वाया जात नाहीत, हे यातून सिद्ध होते. म्हणून महाराष्ट्र शासनानेसुद्धा या अभियानाला संत गाडगेबाबा या श्रमयोगी मानवाचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा एका परीने गौरव केला आहे असे म्हणावे लागते.

आज महाराष्ट्रात सावकारशाहीने धुमाकुळ घातलेला आहे. सावकारशाही, कर्जबाजारीपणांमुळे हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या ज्वलंत समस्येकडे आता कुठे शासनाचे लक्ष गेले आहे. गाडगेबाबांनी आयुष्यभर सावकारशाही नष्ठ

करण्याचे प्रयत्न व आवाहन केले होते. ते कार्य आज महाराष्ट्र शासन करीत आहे. यातून गाडगेबाबांनी काळाची पुढची पाऊले ओळखली असल्याचे सिद्ध होते. बेघरांना निवारा हा गाडगेबाबांचा संदेश होता. या संदेशाची पूर्ती महारष्ट्र शासन गोरगरीबांना घरकुले बांधून देऊन पूर्ण करत असल्याचे दिसते.[२]

संत गाडगेबाबांनी स्वत: निरक्षर असून देखील आयुष्यभर शिक्षणाचे महत्व पटवून देऊन शिक्षण प्रसाराचे कार्य केले. महाराष्ट्र शासनाने अमरावती विद्यापीठास संत गाडगेबाबांचे नाव देऊन या निरक्षर संताचा गौरव केला आहे. जन्मभर निरक्षर असलेल्या महापुरूषाचे नाव अमरावती विद्यापीठास मिळणे ही बाब निश्चतच उल्लेखनीय आहे. याच विद्यापीठात मा.सुधाकररावजी देशमुख, मा.आमदार उल्हासरावजी पवार यांच्या प्रेरणेतून व प्रत्येकी ५ लाख रूपये आर्थिक सहकार्यातून **'श्री संत गाडगे महाराज अध्यासन केंद्र'** सुरू केले आहे.[३] या केंद्रातून गाडगेबाबांचे विचारकार्य समाजापर्यंत पोहचविले जात आहे ही अभिमानस्पद बाब आहे. गाडगेबाबांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी भारत सरकारने गाडगेबाबांचे चित्र असलेले टपाल तिकीट काढले आहे ही सुद्धा उल्लेखनीय गोष्ट आहे.

## समकालीनांकडून झालेले मूल्यमापन :-

श्री गाडगेबाबा व गाडगे महाराज मिशनच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे मूल्यमापन करण्याचा अनेक समकालीन थोर व्यक्तीनी आपापल्या परीने प्रयत्न केला आहे.

"गाडगेबाबांच्या सारखी विभूती जन्मास घालून ईश्वराने मनुष्यप्राण्यावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. प्रेमाची भूक ही खरी गरीबी आहे श्री गाडगेबाबांनी दीन-दुबळयांवर प्रेम केले त्याचे अखंड जीवन प्रेमावर आधारित असून त्यांनी ते कृतीत उतरविले".

- नोबेल विजेत्या मदर तेरेसा

"मार्क्स हा मनुष्य होता का माकड हे सुद्धा ज्यांना माहित नव्हते त्या गाडगेबाबांनी महाराष्ट्रात मार्क्सवाद स्थापन केला". **- प्रबोधनकार केशव ठाकरे**

"गाडगेबाबांनी लोकांकडून कोटयावधीची संपत्ती मिळवली पण गाडगे सोडले नाही, कवडया टाकल्या नाहीत, चिंध्या फेकल्या नाहीत, हा होय खरा अनासक्ती योग गाडगे बाबा म्हणजे युगाचे होमकुंड होते, धैर्याचा हिमालय होते".

**- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

"श्री गाडगेबाबा हे आधुनिक इतिहासातील एक चमत्कार गणला पाहिजे. त्यांनी आपल्या निस्पृह समाजसेवने निरक्षर असूनही आपल्या कीर्तनातील शुद्ध हितोपदेशाने हजारो संख्येच्या जनतेला वेड लावले व त्यांच्या सहाय्याने लोकोपयोगी संस्थांची स्थापना केली".[४] **- इतिहासाचार्य न.र. फाटक**

"संत गाडगे महाराजांच्या समाजसेवेच्या आणि राष्ट्रसेवेच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टीने श्री संत गाडगे महाराज मिशन ही संस्था करीत असलेले कार्य महत्वपूर्ण आहे. श्री गाडगे महाराजांचे विचार आजही आपल्याला उपयुक्त असे आहेत". **- मा.ना.शरदचंद्रजी पवार**

"श्री संत गाडगेबाबांनी आपले संपूर्ण जीवन समाजसेवेस अर्पण केले होते जातीभेद, अंधश्रद्धानिर्मूलन, ग्रामस्वच्छता आदिबाबत त्यांनी आपल्या कीर्तनातून तसेच आचरणातून प्रसार करून संपूर्ण समाजात क्रांती घडवून आणली. विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा, वृद्धांसाठी वृद्धाश्रम, धर्मशाळा व धर्मार्थ दवाखाने ... इत्यादी बाबत त्यांनी केलेले कार्य आजही समाजास मार्गदर्शक ठरणारे आहे".[५]

**- मा.ना.आर.आर.पाटील**

"एका उपेक्षित परीट समाजातल्या निरक्षर, अज्ञानी माणसाने पन्नास वर्षे म्हणजे दिवसांच्या भाषेत सतरा-आठरा हजार दिवस गरीबीत राहून व गरीबांच्या शुद्र आणि विझत चाललेल्या आयुष्यात हाती तसे काहीच नसताना म्हणजे पद, सत्ता, संपत्ती नसताना काळोखी जीवनात प्रकाश पेरला. बुद्धांची करूणा, महावीरांची अहिंसा ख्रिस्तांचे

प्रेम, मार्क्सचा साम्यवाद, गांधींचा सर्वोदय, म. फुले यांनी सांगितलेली सर्वक्षेत्रातील समता या एकाच माणसाच्या ठायी एकरूप झाल्या होत्या. हजारोंना वस्त्रज्ञान करणारा पण स्वत: चिंध्या पांघरणारा, लाखोंना सुग्रास जेवण देणारा पण स्वत: कांदा भाकरी खाणारा, लाखोंनी जननायक मानलेला पण स्वत:ला जनसेवक समजणारा, स्वत:ला नमस्कार न करून घेणारा, पण प्रत्येकाला पत्रातून अनंत कोटी नमस्कार घालणारा असा माणूस पाहिला नाही म्हणून या माणसाचे मूल्यमापनासाठी 'लोकोत्तर' एवढा एकच शब्द वापरावा लागेल." [६] **- प्रा. द. ता. भोसले**

संशोधनाअंती गाडगे महाराज मिशनच्या गेल्या पाच दशकातील कार्याचा अभ्यास केल्यानंतर वैशिष्टयरूपाने मिशनच्या कार्यांचे काही निष्कर्ष समारे येतात.

१. श्री गाडगे महाराज मिशन ही शैक्षणिक व सेवाभावी कार्य करणारी महाराष्ट्रातील प्रमुख संस्था आहे.

२. गाडगे महाराज मिशनद्वारे आदिवासी भागात तसेच दुर्गम खेडोपाडी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरू आहे.

३. धर्मशाळा, आश्रमशाळा, वसतिगृहे, पाळणाघरे, निराधार बालकाश्रम, कन्याशाळा, मुला-मुलींची स्वतंत्र वसतिगृहे, ज्युनिअर कॉलेज, धर्मादाय दवाखाने, पाणपोई, अशा बहुविध स्वरूपात गाडगे महाराज मिशनचे कार्य चालले आहे.

४. मिशन संचलित सर्वशाखांच्या इमारती गाडगे महाराज मिशनच्या मालकीच्या आहेत. या इमारती सर्व सोई-सुविधांनी युक्त आहेत.

५. गाडगे महाराज मिशनने कोणत्याही शाखेचे नाव विकलेले नाही. बहुसंख्य शाखेस श्री गाडगेबाबांची नावे दिलेली आहेत.

६. गाडगे महाराज मिशनमधील काही सेवक कीर्तनाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य करतात. त्यांना महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. त्यासाठी शासनाकडून दरवर्षी ठराविक अनुदान दिले जाते व त्यातून खर्च भागविण्यात येतो.

७. गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनाचे आणि नेतृत्वाचे केंद्रीय व स्थानिक असे दोन विभाग केले आहेत. त्याचा फायदा गाडगे महाराज मिशनच्या विकास कार्यासाठी झालेला दिसून येतो.

८. श्री गाडगेबाबांची शिकवण, संदेश कार्याचा प्रसार करणेसाठी आणि त्यातून इतर व्यक्ती व संस्थाना शैक्षणिक व सेवाभावी कार्यासाठी चालना देण्यासाठी श्री गाडगे महाराज मिशनमार्फत 'श्री गाडगे महाराज सेवा पुरस्कार' देण्यात येतो.

९. गाडगे महाराज मिशनमधील अनेक जेष्ठ सेवकांनी १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात भाग घेतला होता. ( उदा. कै. जिजाबा मोहिते, कै. विश्वनाथ वाघ, यशवंतराव माने इत्यादी )

१०. हिंसाबंदी, दारूबंदी, हुंडाबंदी, अस्पृश्यता निर्मूलन, शिक्षण प्रसार, अंध-पंगू-रोग्यांची सेवा, सार्वजनिक विवाह, आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास यासाठी गाडगे महाराज मिशनने भरीव कामगिरी केली आहे.

११. गाडगे महाराज मिशन संचलित अनेक शाखा तसेच सेवकांना 'दलितमित्र' व 'आदिवासी सेवक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

१२. गाडगे महाराज मिशनचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रातील २२ पेक्षा अधिक जिल्हयात विस्तारले आहे.

१३. गाडगे महाराज मिशन संचलित सर्व शाखांमधून श्री गाडगेबाबा स्मृती-सप्ताहनिमित्त डिसेंबर महिन्यात वृक्षरोपण, साक्षरता प्रसार, स्वच्छता प्रसार मोहिम, व्यसनमुक्ती, अन्नदान, वस्त्रदान, रोगचिकित्सा शिबीरे आयोजित केली जातात.

## संदर्भ साधने :

१. रामपूरे शिला, ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि त्याचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव : सांगली आणि कोल्हापूर जिल्हयातील दोन निवडक गावांचा अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, एम्.फिल 'समाजशास्त्र' अप्रकाशित प्रबंध, जून-२००७, पृ - १, ३.

२. खांडवे तु.धों. (संपा.), श्री गाडगे बाबा त्रैमासिक, (जूलै, आगस्ट, सप्टेंबर) २००६, पृ - ९.

३. खांडवे तु.धों. (संपा.), श्री गाडगेमहाराज मिशन सवर्णमहोत्सव विशेषांक, पृ- २४.

४. भगत.रा.तु. (संपा.), संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, २००४, पृ. ७६७ - ७७४.

५. गाडगे महाराज मिशन वार्षिक अहवाल, सन १९९१-९२ व १९९२-९३.

६. भोसले द.ता.,लोकोत्तर गाडगेबाबा: जीवन आणि कार्य,२००७, पृ-३१०.